# आमचे टीकाकार

———×———

'समाजस्वास्थ्य मासिकांतील निवडक लेख. भाग २ रा.' या पुस्तकाचें परीक्षण करण्याच्या निमित्ताने वाङ्मय मासिकाच्या श्रावण महिन्याच्या अंकांत 'मोरेश्वर' नामधारी एका लेखकाने 'परोपदेशे पांडित्य' करून आमच्यावर बरेच खरेखोटे आरोप केले आहेत समाजाचें स्वास्थ्य कशाने साधतें याबद्दल मतभेद असणें शक्य आहे, परंतु समाजस्वास्थ्य मासिक आम्हीं मोरेश्वरांचे मताप्रमाणे चालवावें हें आम्हास मान्य नाही या पुस्तकांत खटल्याचे हकीकतीने जागा अडवली आहे अशी त्यांची तक्रार आहे परंतु आमचेवरील खटला खाजगी स्वरूपाचा नसून मासिकांतील लेखांसंबंधी होता, तेव्हा त्याची हकीकत मासिकांत येणें आमचे मतें युक्तच आहे. आमचे लेखांत विचारांचा खोलपणा, माहिती, स्वानुभवाचा पुरावा वगैरे मोरेश्वरांस दिसत नाही. पण मोरेश्वरांसारखें सर्वांनाच कसें लिहितां येईल ? शिवाय या लेखांत मोरेश्वरांच्या 'खोल' विचारांचे जे मासले दिसतात, त्यांवरून त्यांच्या सारखें लिहिण्याची इच्छाहि आम्हांस होत नाही हें कबूल करणें भाग आहे. या संग्रहांत त्यांना एक भाषांतरित गोष्ट दिसली बहुधा 'कठिण प्रसंग' या लेखाला ते गोष्ट म्हणत असावेत. परंतु ती खरी घडलेली हकीकत आहे, गोष्ट नाही, हें तो लेख वाचून समजण्यासारखें आहे. अनेक लेख भाषांतरित आहेत असा त्यांचा एक आक्षेप आहे, आणि तो खरा आहे. आम्ही संपादक असूनहि स्वतःला सर्व विषयांत तज्ज्ञ समजत नसल्यामुळे त्या त्या विषयांतील तज्ज्ञांचे आधारेंच आम्हास लेख लिहावे लागतात. 'थंड पेयें' या लेखांत रोमन लोकांच्या बर्फ सांठवण्याची माहिती दिली आहे, ती खेडेगांवांतील लोकांच्या उपयोगाची नाही अशी त्यांची तक्रार आहे. स्वतःच्या खेड्यापलीकडे काय चाललें आहे हें खेडवळांस कोणी सांगतां नये असा 'मोरेश्वर' यांचा आग्रह दिसतो. आमचा

मतभेद आहे प्रवास हें शिक्षणाचे उत्कृष्ट साधन समजतात, परंतु ज्यांना ते शक्य नाही, त्यांना इतर देशांची माहिती देण्याने त्यांचें शिक्षण होतें असे आमचें मत आहे. मोरेश्वर म्हणतात, दमून भागून आलेला मनुष्य तुमचा उपदेश ऐकून गरम पेय पिणार नाही, तो थंड पाणीच मागणार. गरम पेयें पिण्याची सहज प्रवृत्ति असती तर तसा उपदेश करण्याचें कारणच नव्हतें, ती नाही म्हणूनच कारण पडतें. तो ऐकणें न ऐकणें मर्जीची गोष्ट आहे, म्हणून तो करू नये असें नाही. ' वितरति गुरुः प्राज्ञे विद्यां यथैव तथा जडे । नतु खलु तयोर्ज्ञाने शक्ति करोत्यपहंति वा ॥ अर्थात् मोरेश्वरांनी जें म्हटलें आहे की आम्ही प्रोफेसरकी सोडली तरी तिच्यामुळे अंगांत भिनलेला पंतोजीपणा गेला नाही, त्याबद्दल आम्हांस अभिमानच वाटतो. परीक्षांत अपयश आल्यामुळे श्री. मामा वरेरकर जशा महिलाविद्यापीठाला शिव्या देतात, त्याचप्रमाणे पंतोजीच्या छडीचाच विशेष अनुभव मिळाल्यामुळे की काय कोणाला ठाऊक, मोरेश्वर 'पंतोजी' शब्द तिरस्काराने वापरतात, परंतु आम्हांस त्यांत बिलकुल कमीपणा वाटत नाही. कोणत्याहि प्रकारची माहिती द्यायला जो मनुष्य निघाला तो पंतोजीचेंच काम करतो, मग तो मोरेश्वरांस कितीहि तिरस्करणीय वाटो, आणि माहिती देणें व पुढारलेल्या मतांचा प्रचार करणें हाच आमच्या मासिकाचा उद्देश आहे. मोरेश्वर म्हणतात 'उसन्या विचारांत अनुभवाचा पुरावा कसा मिळणार ?' आमचे विचार कधीहि उसने नसतात, माहिती पुष्कळ वेळां उसनी असते आणि हें कोणासहि लागू पडेल. थंड व गरम पेयांचे परिणाम काय होतात हा माहितीचा प्रश्न आहे, परंतु तेथेंहि अनुभव घेतां येतो, आणि तसा आम्हीं घेतला आहे आणि कोणासहि घेतां येईल. अर्थात् गर्मीवर एखादा लेख लिहिल्यास त्याचा अनुभव आम्ही घेणार नाही, तज्ज्ञांचे माहितीवरूनच लिहिणार, मग मोरेश्वर कितीहि नांवें ठेवोत.

निष्पक्षपाताचा आव आणून मोरेश्वरांनी शेवटीं आपलें बिंग फोडलें आहे. ते म्हणतात, 'सर्वत्र परकीय विचारांचा सुळसुळाट !' म्हणजे विचार परकीय आहेत की स्वकीय आहेत, यावरून मोरेश्वर त्यांची किंमत ठरवणार !

## आमचे टीकाकार

मोरेश्वर स्वतः पारंपरिक आहेत हें त्यांनी नकळत सांगून टाकलें आहे, तेव्हा त्याना आमचे विचार पसंत कसे पडणार ? आमची भाषा कडवट आहे, तिला अहंमन्यतेचा दर्प येतो आणि आम्ही स्वार्थत्यागाचें प्रदर्शन करतों असें मोरेश्वरांचें म्हणणें आहे. मोरेश्वरांसारखी गोड भाषा आम्हांस कशी लिहितां येणार ? अहं-मन्यता थोडीबहुत आमचे अंगांत आहे, परंतु आम्ही स्वार्थत्यागाचें प्रदर्शन करतों हा आरोप मात्र खोटा आहे. नोकरी सोडल्याबद्दल आम्हांस अभिमान वाटतो असेंहि ते म्हणतात, आणि सोडल्याबद्दल पश्चात्ताप होतो असेंहि हळूच सुचवतात. ज्या गोष्टीचा अभिमान वाटतो तिचाच पश्चात्ताप होणें कसें शक्य आहे ? दोष दाखवतांना देखील सुसंगति राखावी याचें मोरेश्वरांस भान राहिलेलें नाही. वस्तुतः दोन गोष्टींपैकी एकीची निवड करण्याचा प्रसंग कोणावरहि आल्यास जीपासून स्वतःला बरें वाटेल तीच गोष्ट मनुष्य निवडतो, तेव्हा पैशाची हांव न धरतां आम्ही आमचे मतें महत्वाच्या समाजकार्यास लागलों ते केवळ स्वतःच्या समाधानाकरताच, त्याबद्दल कोणीं आमचा गौरव करावा असें आमचें बिलकुल मत नाही. तेव्हा यांत प्रदर्शन करण्यासारखें कांही नाहीच, आणि याचा उल्लेख या लेखसंग्रहांत फक्त दोन ठिकाणीं जरूरीपुरताच ओझरता आला आहे, हें सरळ मनुष्यास सहज समजेल.

आम्ही चिडून शिव्या देतों हा मोरेश्वरांचा आरोप साफ खोटा आहे आणि मोरेश्वरांनी याचें एकहि उदाहरण दाखवलेलें नाही. ते ह्मणतात त्याप्रमाणे आह्मीं ब्रह्मचर्याला, विवाहाला किंवा त्यांच्या पुरस्कर्त्यांनाहि शिव्या दिलेल्या नाहीत. दोष दाखवणें ह्मणजे शिव्या देणें नव्हे. विवाहसंस्था अत्याचारी आहे, कारण वेश्यांस किंवा पशूंस देखील जें स्वातंत्र्य असतें तितकेंहि विवाहित स्त्रियांस रहात नाही, त्यांचेवर अत्याचार होतो; तसेंच ब्रह्मचर्य पाळण्याच्या प्रयत्नाने अनेकांचें भयंकर नुकसान होतें हें आह्मीं प्रत्यक्ष पाहिलें आहे. हे विचार परकीय ठरवून त्याज्य समजावयाचे असल्यास समजा, परंतु जे डोळे उघडे ठेवतात त्यांना दिसणाऱ्या या गोष्टी आहेत, त्या कोणी परकीयाने सांगितल्या पाहिजेत असें नाही, पण परंपरेपुढे अनुभवाला कोण विचारतो ? मोरेश्वर ह्मणतात त्याप्रमाणे

आह्मी कोणाचीहि परंपरा चालवित नाही, वर सांगितलेल्या गोष्टी समजण्यास नॉर्मन् हेअर, रॉबिनसन्, रसेल्, हॅवलॉक् एलिस् वगैरेंची जरूरी नाही, आणि आह्मीं यांचीं मतें दिलीं तीं त्यांची ह्मणून खरीं माना असें आह्मी कोठेहि सांगितलें नाही, परंतु केवळ परंपरेला विरुद्ध ह्मणून नांवें ठेवणाऱ्या मोरेश्वरांसारख्या लोकांना हेंहि सांगणें भाग पडतें की हीं एखाद्याच भडकलेल्या माणसाचीं मतें नाहीत, जगांतील कांही सर्वमान्य विचारवंतांचीं मतें आहेत. कोणाचीहि मतें बाबावाक्य ह्मणून ग्राह्य समजूं नका, स्वतः विचार करून ठरवा, असेंच आह्मी सांगत आलों आहोंत आणि पुन्हा सांगतों. 'पारंपरिक' हा शब्द शिवी ह्मणून आम्ही वापरीत नाही, खरें वर्णन म्हणून वापरतों. परिणामाकडे न पाहतां जे परंपरेला चिकटतात ते पारंपरिक. जुन्याच्या थरामुळे नवे विचार ज्यांच्यापर्यंत पोचत नाहीत ते बुरसट. विवाहसंस्थेला पोषक म्हणून मोरेश्वर 'म्युसोलिनी' व 'हिट्लर' यांचीं नांवें सांगतात हे अत्याचारी राक्षस म्हणतात तसेंच आम्हींहि म्हणावें असें मोरेश्वरांचें म्हणणें असल्यास त्यांना साष्टांग नमस्कारच घालणें भाग आहे! ते म्हणतात कुत्रीं, माजरें, यांच्यांत विवाहसंस्था नसल्यामुळे मारामाऱ्या, खून, अत्याचार होतात, पण याला बिलकुल पुरावा नाही. विवाहसंस्था असलेल्या आणि म्हणून पतिपत्नींना एकमेकांची मालमत्ता समजणाऱ्या मनुष्यप्राण्यांतच मारामाऱ्या आणि खून होतात.

ब्रह्मचर्याविषयी मोरेश्वरांची विचारसरणी अजब आहे. ते म्हणतात की ब्रह्मचर्याचा उपदेश प्राचीन कालापासून चालू आहे, पण त्यामुळे कोणतेंच नुकसान झालें नाही, कारण तें फारसें कोणी पाळीतच नाही (!) आणि शिवाय "साधारणतः वयाच्या पंधरापासून सतरा वर्षांपर्यंत मुलांच्या शरीरांत जर वीर्योत्पत्तिच होत नाही, तर अशांना ब्रह्मचर्य पाळण्यास सांगण्यांत चुकलें कोठें? वीर्याची उत्पत्ति झाल्यावरहि विद्यार्जनांत व्यत्यय येऊं नये म्हणून ब्रह्मचर्य राखण्याचा उपदेश केला गेल्यास कोणतें नुकसान होणार आहे?" आम्ही मुलांपुढे स्वैराचाराचा आदर्श ठेवतों असेंहि त्यांनी ध्वनित केलें आहे, पण तें खोटें आहे.

एकंदरींत उपयोग नसेल तेव्हाहि ब्रह्मचर्याचा उपदेश करावा, असेल तेव्हाहि करावा असें मोरेश्वरांचें म्हणणें आहे ! परंतु जेव्हा उपयोग असतो असें ते म्हणतात, तेव्हाहि तो वस्तुतः नसतो. ब्रह्मचर्यानें विद्यार्जन सुलभ होत असतें तरीही इतर प्रकारें नुकसान होणें शक्य होतेंच, पण विद्यार्जनहि सुलभ होत नाही. आणि या बाबतींत आम्हासहि अनेकांचे अनुभव माहीत आहेत, आणि शेंकडों तरुणांची माहिती ज्यांचे समोर आहे अशा जज्ज बेन लिंडसेसारख्या लोकांनीहि हेंच मत दिलें आहे आणि त्यावर उपाय सुचवले आहेत.

आम्ही मद्यार्कांचा पुरस्कार करतों हें खोटें आहे, हें आमचे लेख वाचणारांस सहज समजेल. 'स्वसंभोगाचा जर अतिरेक होतो तर त्याबद्दल तीव्र नापसंती व्यक्त व्हावयास पाहिजे होती' असें त्यांचें म्हणणें आहे. अन्नाचाहि अतिरेक होतो, मग अन्नाबद्दलहि तीव्र नापसंती व्यक्त केली पाहिजे ! तालीमबाज लोक सर्वच नपुंसक किंवा मठ्ठ डोक्याचे असतात असें आम्हीं किंवा कोणींहि म्हटलेलें नाही, परंतु पुष्कळ वेळां असें असतें असें तज्ज्ञांचें मत आहे. या कामशास्त्रांतल्या सामान्य गोष्टी आहेत. प्रकृति नीट राखण्यास जितक्या व्यायामाची जरूरी असेल तितका करावा असें आम्हीहि म्हणतों, परंतु त्याला तालीमबाजीची जरूरी नसते आणि या बाबतींत 'अधिकस्य अधिकं फलं' असें नसतें हें लक्षांत ठेवावें. मोरेश्वरांचे मतें तालीमबाजीनें देशाचें हित होणार असलें तरी त्यांच्या करतां खोटें बोलण्याची आमची तयारी नाही.

मोरेश्वर म्हणतात, शारदाबाईंची पत्रें म्हणजे गारुड्याची पोतडीच, आणि त्यांतील विचारसरणी आमच्या लिखाणासारखीच असते. शारदाबाईंचीं पत्रें एका मैत्रिणीस लिहिलेलीं आहेत, अमूक एका विषयावर म्हणून लिहिलेलीं नाहीत, मग त्यांना गारुड्याची पोतडी म्हणण्यांत काय अर्थ आहे ? विचारसरणी पाहिली तर अशीच विचारसरणी जगांतील कोणत्याहि पुढारलेल्या लेखकाच्या लिखाणांत सांपडेल. मित्रांस लिहिलेल्या पत्रांत स्वतःबद्दल हकीकत आल्यास नवल काय ? ती छापण्यालायक आहे की नाही हा आमचा प्रश्न होता, शारदाबाईंचा नव्हता,

परंतु स्वतःच्या मताप्रमाणे वागण्याचें धैर्य दाखवणारांचें चरित्र उद्बोधक असतें असें आमचें मत आहे आणि म्हणूनच तीं पत्रें छापलीं आहेत.

मोरेश्वरांचे लेखावरून ते कोणत्याहि विषयांत तज्ज्ञ असल्याचें दिसत नाही. तेव्हा मद्यपान, ब्रह्मचर्य, स्वसंभोग वगैरे विषयांत आम्हीं जगन्मान्य विद्वानांचीं व आमचीं स्वतःचीं मतें बाजूला ठेवून मोरेश्वरांचीं मतें ग्राह्य कां समजावीं हें आम्हांस अजून कळलें नाही. मोरेश्वर उपरोधाने आम्हास असामान्य विद्वान म्हणून, सामान्य लोकांवर आमची मतें लादण्यांत आमची घिसाडघाई होत आहे असें म्हणतात. यांत घिसाडघाईचा प्रश्नच येत नाही. माहिती देण्यांत किंवा मतप्रचार करण्यांत घिसाडघाई कशी होईल ? एखादा कायदा करणें असेल तर तेथे जनतेच्या प्रगतीच्या मानाने घाई होते असें म्हणतां येईल. उद्यापासून रस्त्यांत नग्न हिंडावें असें आम्हीं म्हटल्यास घिसाडघाई म्हणतां येईल. परंतु जेथे केवळ मतांचाच प्रश्न आहे तेथे आम्ही खरें वाटेल तेंच सांगणार, वाइटाला वाईट म्हणणार, मूर्खांना मूर्ख म्हणणार, मग मोरेश्वरांना आमची भाषा कितीहि कडवट लागो. विवाहसंस्थेंत दोष आहेत हें मोरेश्वर कबूल करतात; आम्हास जे दोष वाटतात ते आम्ही दाखवतों, यांत बिघडलें कोठे ? विवाहसंस्थाहि नवीन नाही, व्यभिचारहि नाही, स्वसंभोगहि नाही. जगांत काय चाललें आहे, कोणते नवीन शोध लागत आहेत, त्यांमुळे मतांतर कसें होत आहे, हें सामान्य बुद्धीच्या मनुष्यास कळणें कठिण नाही. त्याने एकदम त्या मताप्रमाणे वागावें हें शक्यही नाही, आणि आमची तशी अपेक्षाहि नाही, पण म्हणून अशा मतांचा पुरस्कार करूं नये असें थोडेंच होतें ?

उदाहरणें न देतां आमच्या लेखांत विचारांचा खोलपणा, माहिती वगैरे नाही, पत्रव्यवहारांत दिलेलीं उत्तरें हातचलाखीचीं व धरसोडीचीं आहेत, भाषा कडवट असते, वगैरे विधानें मोरेश्वरांनी केलींच आहेत, आणि एवढ्यावरच ते थांबले असते तर त्यांच्या अज्ञानाचें प्रदर्शन झालें नसतें, पण दोष दाखवण्याच्या घिसाडघाईत यांची शुद्ध कोणाला ? किंवा कदाचित् लोक आपल्याला तज्ज्ञ समजतील या भीतीने त्यांनी अज्ञानाचें प्रदर्शन मुद्दामच विनयाने केलें असेल !

पण आमचे अंगीं तसला विनय नसल्यामुळे आम्ही पंतोजीप्रमाणे त्यांस पुन्हा सांगतों की 'वीर्याबरोबर जे इतर रस बाहेर पडतात त्यांच्या जाण्याने शरीराची हानि होते' ही त्यांची कल्पना चुकीची आहे. ज्याचा शरीराला खरा उपयोग असतो तो बीजकोशांचा अंतःस्राव. आणि तो मोरेश्वरांच्या परवानगीशिवायच रक्ताशी मिसळून आपलें काम करीत असतो, आणि त्याचें एक महत्त्वाचें काम म्हणजे कामवासना उत्तेजित करणें हें असतें. कोणत्याहि इंद्रियाचा योग्य उपयोग न झाल्यास तें निरुपयोगी होऊं लागतें, विद्यार्जनाची सबब तेथे उपयोगी पडत नाही. आहार, निद्रा, मैथुन हीं प्राणिमात्राला लागू आहेत असें तेच म्हणतात, तेव्हा तेंच उदाहरण घेऊन सांगतों की विद्यार्जनाचे निमित्ताने झोंप न घेणें जितका मूर्खपणा होईल, तितकाच मूर्खपणा उपोषणांत किंवा ब्रह्मचर्यांत आहे. नियमित आहारांत जसा फायदा असतो, तसाच फायदा नियमित समागमांत असतो, तोटा नसतो. नियमितपणांत शहाणपणा आहे, उपोषण व ब्रह्मचर्य हीं दोन्ही धार्मिक खुळें आहेत. कोणता मार्ग पतकरावा, हा मर्जीचा प्रश्न आहे, खरें बोलणें हें आमचें काम आहे.

---

# क्लैब्यं मा स्म गमः–२.

---

एकदा का शिक्षणाची दिशा चुकून मुलाच्या किंवा मुलीच्या मनांत कमकुवतपणा आला, म्हणजे हा रोग त्यांना जन्मभर पछाडतो इतकेंच नव्हे तर त्यांच्या मुलांना देखील याचा संसर्ग होतो आणि असें हें पिढ्यान् पिढ्या चालतें. हीं मुलें पुढील आयुष्यांत काय करणार ? आईबापांप्रमाणेच निर्जीव जीवन काढणार, आणि बहुजनसमाजाला स्वतःचें हित कळत नाही, या पारंपरिक समजुतीला पुष्टि आणणार.

या समजुतीमुळेच सर्व बाबतींत अधिकारी वर्ग निर्माण होत असतो. धार्मिक बाबींचा मोकळेपणाने खल होण्याऐवजी अधिकारी वाणीने निर्णय देणारे

पोप, शंकराचार्य, मौलवी वगैरे उत्पन्न होतात. राजकीय बाबतींत सरकारचा अधिकार कायद्याने उत्पन्न होतो असें म्हणतात. पण कायदा कोणीं केला, तर त्याच सरकारने ! सर्वांत महत्त्वाचा म्हणजे बापाचा अधिकार. बाप एखादा दारुड्या असो, किंवा सारा दिवस आफिसांत अधिकाऱ्यांचे बूट चाटावे लागल्यामुळे त्याचा सूड घरीं बायकामुलांवर काढणारा भ्याड असो, त्याला मान हा दिलाच पाहिजे !

या सर्व प्रकारामुळे अधिकाऱ्यांत मगरुरी उत्पन्न होते आणि तिचे परिणाम आपल्याला दररोज दिसतात. आपण सावध न राहिल्यास आपलें व्यक्तित्व या सर्व अधिकाऱ्यांमुळे नष्ट होतें आणि आपण यंत्र बनतों. आपल्या अगदी अंतस्थ आकांक्षांचा देखील यामुळे चुराडा होतो आणि त्या दडपून टाकाव्या लागल्यामुळे मानसिक व्याधि उत्पन्न होतात असें फ्रॉइड् म्हणतो. व्यक्तित्व नाहीसें झाल्यानंतर बहुजनसमाजावर सहज पाहिजे तसा जुलूम करतां येतो. मेंढरांना कसाईखान्यांत कापतात, त्याचप्रमाणे माणसांना लढाईत कापतात; आणि हें सर्व कशाकरता, तर पुढाऱ्यांचा बडेजाव होण्याकरता.

याला कांही उपाय नाही असें मात्र नाही. मनुष्यांत भ्याडपणा कसा उत्पन्न होतो याचा प्रथम बारकाईने विचार केला पाहिजे. लहान मूल घाबरट कां होतें ? प्रथम त्याला आयुष्यांत कांहीच माहीत नसतें, आसपास जें जें होईल तें तें पाहून व ऐकून त्याचा स्वभाव बनतो. त्याला विचारशक्ति नसते, काय होईल तें सहन करण्यापलीकडे त्याला कांही करतां येत नाही. प्रत्यक्ष पाहून देखील त्याला पुष्कळ गोष्टी कळत नाहीत, परंतु त्यांचा परिणाम मात्र अपेक्षेपलीकडे होतो. आईबापांचें आपसांत भांडण झालें, किंवा एखादे वेळीं मारामारीपर्यंत वेळ आली, तर मुलांवर त्याचा भयंकर परिणाम होतो आणि नंतर कोणीहि ओरडून बोललें तरी तीं घाबरतात. या हळुवारपणामुळेच मुख्यतः भ्याडपणा उत्पन्न होतो. तेव्हा मानसिक शांति हा एकच त्यावर उपाय आहे, पण ज्या घरांत ती नसतेच तेथे मुलांना ती मिळावी कशी ? पुढे उदाहरण

असेल त्याचें अनुकरण मुलें करतात आणि हें उदाहरण जर चांगलें नसेल तर त्याचा परिणाम त्यांना जन्मभर भोगावा लागतो. मनाची स्थिरता जर त्यांस लाभली नाही तर निश्चय आणि दूरदर्शित्व हीं त्यांच्या अंगांत कधीहि येत नाहीत, आणि त्यांना जर फारशी बुद्धि किंवा महत्वाकांक्षा नसली तर तीं केवळ नांवाला मात्र जगतात.

अशा तऱ्हेने शरीराने व मनाने पंगू झालेल्या जनतेवर आपमतलबी मुत्सद्दी आणि धर्मगुरु पुस्तकांनी, नाटकांनी, व्याख्यानांनी, आणि इतर अनेक प्रकारांनी इच्छित परिणाम करूं शकतात. त्यांतल्या त्यांत जर एखादा मनुष्य भ्याड असूनहि बुद्धिमान असला तर त्याचे हाल पुसूंच नये. त्याची पदोपदीं मानहानि झाल्यामुळे एकतर तो मूकवृत्ति पतकरील किंवा चालू स्थितीपेक्षा कांही वाईट असणें शक्यच नाही अशा खात्रीने तो क्रांतिकारक होईल.

याला उपाय आहेत असें वर म्हटलें, त्याचा आतां विचार करूं. एक ३० वर्षांचा भ्याड मनुष्य घेऊं. वास्तविक पाहतां या वयांत मनुष्याच्या सर्व शक्तींचा आणि भावनांचा पूर्ण विकास झाला पाहिजे. भ्याड मनुष्याला काय कमी असतें, असें पाहिल्यास उघड दिसतें की त्याला स्थिर चित्ताने विचार करतां येत नाही. मानसिक शांति एवढेंच काय तें कमी असतें. ही शांति मिळाल्यास त्याची सर्व भीति आणि आशंका नाहीशी होईल. पण ही शांति मिळावी कशी ?

याकरता अनेकांनी अनेक प्रकारचे शारीरिक व मानसिक उपाय सांगितलेले आहेत, परंतु ते इतके गुंतागुंतीचे आहेत, की ते करण्याची कितीहि इच्छा असली तरी त्या घोटाळ्यानेच पुष्कळ लोक घाबरतात. वास्तविक इतका घोटाळा करण्याचें कारण नसतें. धर्मांत हा उपाय असतो, परंतु धार्मिक लोकांना त्याची दादहि नसते, कारण त्यांतील मर्माभोंवती निरर्थक कचऱ्याचा ढीग घातलेला असतो. धार्मिक लोक प्रार्थनेने मनाला एक प्रकारचा तात्पुरता आधार देतात आणि त्यामुळे त्यांना भार हलका झाल्यासारखा वाटतो, पण हा आधार कुबडीच्या

जातीचा असून क्षणिक असतो. टिकाऊ आधार पाहिजे असेल तर तो बाहेरून मिळणें शक्य नाही, तो मनांतूनच निघाला पाहिजे. धार्मिक मनुष्य ईश्वराची मदत मागतो आणि ईश्वर मनाला शांति देतो अशी तो कल्पना करतो, पण वस्तुतः ही शांति केवळ स्वतःवरच अवलंबून असते.

भ्याडपणा हा कल्पनाशक्तीचा रोग आहे, तेव्हा उपायहि कल्पनाशक्तीवरच केला पाहिजे हें उघड आहे. याला दोन उपाय आहेत. एक उपाय ह्मणजे मनुष्याच्या बुद्धीची मदत घेणें आणि दुसरा उपाय सूचनापद्धति. पहिला उपाय करायचा ह्मणजे मनुष्याला असें सिद्ध करून दाखवायचें कीं ज्या संकटांची त्याला भीति वाटते त्यांतलि बहुतेक केवळ काल्पनिक असतात, लोकांचें आपल्याकडे एकसारखें लक्ष असतें आणि आपल्यावर टीका करण्याकरिता लोक टपून बसलेले असतात ही कल्पना खोटी आहे, प्रयत्न केल्यास आपल्याला वाटतें त्यापेक्षा पुष्कळ जास्त गोष्टी आपल्याला करतां येतात, आणि स्वाभाविकपणें वागल्यानें आणि दुसऱ्याच्या मताकडे थोडेंबहुत दुर्लक्ष केल्यानेंच आडमुठेपणा नाहीसा होतो, इ. इ.

दुसऱ्या उपायाकरता कल्पनाशक्ति थोडीबहुत ताब्यांत आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. भ्याड लोक तिचा दुरुपयोग करतात, म्हणजे संताप, द्वेष, गर्व, घमेंड वगैरेकडे उपयोग करतात. याच शक्तीचा उपयोग शांति, आत्मविश्वास आणि धाडस अंगीं आणण्याकडे करतां येतो. तेव्हा सर्व भ्याडांना असें सांगावें की दररोज, बिशेष धडपडीची कल्पना मनांत न आणतां, स्वस्थपणाने, मनांत असें म्हणत जा की माझें सर्व ठीक चाललें आहे, माझें मन शांत आहे, मला पूर्ण आत्मविश्वास आहे, आणि मी मनांत आणीन तें सहज करूं शकेन. ही सूचनेची पद्धत आहे. सूचना दुसऱ्यानें दिलेली चालते, किंवा आपण स्वतःला दिली तरी चालते. पुष्कळ लोक या पद्धतीचा बिलकुल प्रयोग न करतांहि ती निरुपयोगी ठरवतात.

अर्थात् सूचना देतांना शक्य काय आणि अशक्य काय, हें लक्षांत ठेवलें

पाहिजे. वाईट कल्पना काढून टाकून त्यांच्या जागीं चांगल्या कल्पना मनांत आणतां येतात, बावरलेल्या मनाला शांति मिळवतां येते. परंतु प्रयत्नाशिवाय एकदम श्रीमंत होणें किंवा कीर्ति मिळवणें मात्र अशक्य असते. तीर्थयात्रांनी किंवा साधूंच्या उदीने जे चमत्कार होतात, ते सर्व सूचनेनेच होतात. परंतु पाय तुटला असेल तर तो पुन्हा वाढत नाही, टक्कल पडलें असल्यास तेथे केंस येत नाहीत. जे चमत्कार होतात, त्यांकरता धार्मिक अवडंबराची मुळीच जरूर नसते.

आपल्या मनांत असलेल्या सर्व गोष्टींची आपल्याला जाणीव नसते, उदाहरणार्थ एखादी गोष्ट माहीत असूनहि आपल्याला पाहिजे तेव्हा आठवत नाही. तसेंच कांही गोष्टींचा आपल्या मनावर नकळत परिणाम होत असतो आपण समजून एखादा निश्चय करतों तेव्हा सुद्धा या गूढ मनाचा परिणाम होतोच. आपले लक्ष नसतांना देखील एखादें पद्य आपल्यां कानावर पडल्यास तें आपल्या गूढ मनांत राहतें. आणि आपण तें केव्हातरी गुणगुणूं लागतों आणि त्याचें आपलें आपल्यालाच आश्चर्य वाटतें. या गूढ मनाचा आपल्याला उपयोग करून घेतां येईल. आपल्याला उत्साह देणाऱ्या गोष्टी तेवढ्या नेहमी आपल्या मनापुढे याव्या आणि निरुत्साह करणाऱ्या येऊं नये, अशी संवय करतां येईल. पुष्कळ लोकांना याच्या उलट संवय असते आणि म्हणूनच ते भ्याड होतात.

कल्पनाशक्ति ही आपल्या गूढ मनाचीच एक शक्ति आहे. आपल्या हातून ज्या ज्या गोष्टी होतात त्या सर्व गूढ मनाच्याच प्रभावाने होतात, आणि म्हणूनच आपण कितीहि निश्चय केलेला असला तरी एखादे वेळीं आपण त्याच्या विरुद्ध वागतों, आणि त्याला आपला बिलकुल इलाज नसतो. गूढ मनाचें विशेष कांही म्हणणें नसेल तरच आपण निश्चयाप्रमाणे वागूं शकतों. तेव्हा इच्छाशक्ति कितीहि प्रबल असली तरी गूढ मनांतून येणारी कल्पनाशक्ति अधिक महत्त्वाची आहे. कल्पनाशक्तीची मदत घेतल्यास मनाचा उत्साह वाढतो, पुष्कळ अशक्य गोष्टी शक्य होतात आणि सूचनेच्या योगाने मानसिक शांति आणि आत्मविश्वास आणतां येतो.

यांत एक विशेष गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे, की मनाला शांति मिळविण्याचा उद्देश असल्यामुळे शांतीला विरोधक विचारांवर म्हणजे धडपड, झगडा, लढाई, इच्छाशक्ति, चिकाटी वगैरे विचारांवर भर देऊं नये. कोणत्याहि प्रसंगीं मन शांत ठेवणें हें ध्येय समजावें; आणि ही शांति इच्छेने उत्पन्न होत नाही, ती आत्मविश्वासाने उत्पन्न होते. सूचनेच्या पद्धतीवर विश्वास ठेवून ती अंमलांत आणा. मनांत जें कांही म्हणायाचें त्याची निवड काळजीपूर्वक केली पाहिजे. मी अमुक गोष्ट करणार, असें म्हणण्यापेक्षा, मला अमुक गोष्ट करतां येईल असें म्हणा, कारण पहिल्या वाक्यांत कांही तरी अडचणीशी झगडण्याचा बोध होतो आणि पुष्कळ वेळां ही झगड्याची कल्पना फोल असते. काल्पनिक अडचणी उत्पन्न करून त्यांच्याशीच आपण झगडत बसतों आणि आपले श्रम फुकट जातात.

या दृष्टीने जीवनार्थ कलहाची कल्पना वाईट आहे. पुष्कळ वेळां समजुतीनें जें काम होतें तें धडपडीने होत नाही. वादळ येत आहे असें दिसल्यास तांडेल कधींहि गलबत त्याच्या तोंडावर नेणार नाही, बाजूने जाण्याचा प्रयत्न करील. शांति, आत्मविश्वास आणि डावपेंचाने जें यश मिळतें तें समोर लढाईने मिळत नाही, हें जगांत यशस्वी होण्याचें पहिलें तत्त्व आहे. नेपोलियनसारख्या लोकांनी समरांगणावर अनेक लोकांचे बळी दिले, पण नांव कोणाचें झालें ? मेले त्यांचें नव्हे, तर नेत्यांचें. ही यशाची गुरुकिल्ली आहे.

( हा लेख एका फ्रेंच लेखाचें आधारें लिहिला आहे. सं. )

---

# शांतारामचें व्यंग

लेखक, माधव खंडेराव बागल, कोल्हापूर.

त्यांच्याकडे पाहिलें तर तशी कोणालाहि शंका येण्याजोगी त्यांची प्रकृति नव्हती. ते दिसायला चांगले होते, पांचपन्नासांत उठून दिसण्याजोगें रूप होतें.

# शांतारामचें व्यंग

प्रकृति निकोप, स्वभाव मनमिळाऊ, श्रीमान. गांवांत मान्यता होती. वय असेल तीस बत्तीस. या वयाला खरें म्हटलें तर त्यांचें लग्न होऊन एकदोन मुलें झालेलीं असायचीं. पण शांतारामनी अजून लग्नच केलें नव्हतें, त्यांचा लग्नाच विचारहि नव्हता.

घरचे कर्तेसवरते, मोठी इस्टेट, मूलबाळ नाही. त्यांच्या मित्रांनी त्यांना लग्न करून घेण्याबद्दल सारखी निकड लावली होती, पण लग्नाचें नांव काढलें की ते विषय बदलीत. तथापि त्यांच्या आप्तांनी व हितचिंतकांनी त्यांची अगदी पाठपुरवणी केली. वंश राहिला पाहिजे, त्याखेरीज माणसाला स्वर्गांत गति नाही. इस्टेटीला मालक पाहिजे, की चोराला देऊन टाकायची ? असें करून चालणार नाही, वगैरे अनेक प्रकारांनी त्यांचें मन वळवण्याचा प्रयत्न केला. वडिलधाऱ्या माणसांनी होती नव्हती तेवढी भीड घातली. अखेर वडिलांचा मान राखावा म्हणून ते म्हणाले, 'बरें आहे, पाहूं तसेंच स्थळ आलें तर. मनाजोगी मुलगी तरी आहे कोठें ? असें ते वेळ मारून नेण्याकरता कांही तरी बोलायचें म्हणून बोलून गेले.

पण मंडळी काय ? पडत्या फळाची आज्ञा घेऊन त्यांनी स्थळ ठरवूनहि टाकलें. नाकारायला त्यांनी जागाच ठेवली नाही, मुलींत दोष काढतां येणेंच शक्य नव्हतें. रंभेला लाजवील असें रूप, हुंडा म्हणावें तर शब्द काढायचा अवकाश. घराणें, कुलशील, नको म्हणायला कांही कारण तर पाहिजे ? तथापि शांतारामनी एक प्रयोग करून पाहिलाच. ते म्हणाले, 'आपल्याला इतक्या घाईनें लग्न करायचें नाही, पाहूं पुढच्या सालीं.'

पण ही सबब त्यांच्या अंगलटच आली. मुलीचे आईबाप वर्षभरच काय, पण नक्की ठरवून वाटेल तितकीं वर्षें पुढें ढकलण्यास कबूल झाले. आता मात्र उपाय खुंटला. आपण लग्नाचें कां टाळतों याचें खरें कारण सांगण्याचें मनोधैर्य शांतारामच्या अंगीं नव्हतें. तें समजल्यावर त्यांचा समाजांत दर्जा काय उरणार ? उलट ती लोकांच्या उपहासाची गोष्ट होणार. खरें कारण मुलीच्या बापाला सांगि-

तलें असतें तर बापाने आनंदाने लग्नाची कल्पना सोडून दिली असती पण शांताराम सांगणार कोणत्या तोंडानें ?

अखेर समाजाच्या टीकेला, आप्तेष्टांच्या आग्रहाला व स्वतःच्या अब्रूला भिऊन ते लग्नाला कबूल झाले. सर्वांना आनंद झाला. शांताराम सुखवस्तु, खर्चिक, लोकप्रिय. त्यांना अनेक लोक साहाय्य होते. लग्न त्यांच्या नांवाला शोभेसें मोठ्या थाटाने झालें. जोडपें म्हणजे लक्ष्मीनारायणासारखें शोभत होतें. मुलींत दोष काढायला जशी जागा नव्हती, तसेंच शांतारामचें व्यंग कोणाला कळण्यासारखें नव्हते.

लग्नामुळे शांतारामचें मनःस्वास्थ्य मात्र नाहींसें झालें. लोकलज्जेला भिऊन आपण एका मुलीचा गळा कापला हें शल्य त्यांच्या मनाला अहोरात्र टोंचत होतें. त्यांनीं आपल्या जिवलग मित्राजवळ देखील आपलें हृदय उघडें केलें नाही. ते मनांतल्या मनांत झुरत होते. आतां झाल्या चुकीची दुरुस्ती करणार कशी! आपलें रहस्य बायकोपासून दडवून किती दिवस ठेवणार? पण जातील तेवढे दिवस ढकलण्याचा त्यांनी विचार ठरवला. मग पुढे धिंडवडे होतील ते होवोत.

लग्न होऊन मुलगी माहेरीं आली. बायकोला सुखांत ठेवण्याची शांताराम आपल्यापरी शिकस्त करीत होते. त्यांनी तिला दागिन्यांनी तर भरगच्च मढवली होती. हिऱ्यांची चिंचपट्टी, मोत्यांचीं पेंडीं, भारी किंमतीची अंगठी, हिरेमाणकांची कांकणें, एक का दोन, हजारों रुपये किंमतीचा माल अंगावर असेल. जरीचीं लुगडीं रोज वापरांत असत. लक्ष्मी नांवाप्रमाणे लक्ष्मीसारखी सजली होती.

पण देहाचें सुख केवळ दागदागिने आणि लुगडींचोळ्यांत सांठवलेलें असतें थोडेंच ! मग कोटयधीशांच्या मुलींना लग्नाची अवश्यकताच भासली नसती. मुलगी ऐश्वर्यानें नटलेली पाहून आईबापांना आनंदानें गहिंवर आला. खायप्यायला उत्तम, हाकेला नोकर, वाटेल तसले कपडे, जाईल तेथे मानपान, पण मुलीला अंग सुटेना. तिचा चेहरा पहावा तेव्हा विचारांत आणि दुर्मुखलेला.

खायप्यायला कमी नव्हतें, पण लक्ष्मी मात्र खंगत चालली होती. नवरा

तिची काळजी घेई, तिच्याशीं ममतेने वागे, पण ज्या सुखासाठीं लग्नें होत असतात तें देणें त्याला शक्य नव्हतें. त्याचा लक्ष्मीच्या प्रकृतीवर परिणाम झाला. हिंदु स्त्री ती. नवऱ्याला स्पष्टपणें कसें विचारणार ? तिला शब्द आवरतां आले, सौजन्यामुळें तिला नवऱ्याजवळ मन उघडें करतां आलें नाही, तरी भावना आवरणें तिच्या शक्तीबाहेरचें झालें. ती हीन जातीची असती, तिला समाजांत मान्यता नसती, घराण्याच्या लौकिकानें ती बांधली गेली नसती, तर तिने आपल्या सुखाचा मार्ग आपणच शोधून काढला असता. ती एखाद्या गरीबाचीहि बायको झाली असती, पण परिस्थितीमुळे ती जखडून गेली होती.

पण मनांत ती बंडखोर होत चालली होती. तिला नवऱ्याचा राग येऊं लागला होता, तिटकारा येऊं लागला होता. जाणून बूजून आपल्या जन्माचें यानें मातेरें केलें, ह्मणून ती त्याचा द्वेष करूं लागली होती. नाहीतर तिला यावेळीं तीनचार मुलें असायाचीं. पण काय ! ... ती नवऱ्याचा द्वेष करूं लागली, पण तिला काय माहित की तोहि परिस्थितींत पकडला जाऊन या पापाचा धनी झाला. त्याच्या तरी मनांत कोठे होतें लग्न करायचें !

लक्ष्मीची प्रकृति बिघडूं लागली, ती चिडखोर झाली. नोकरचाकरांबरोबर सारखी भांडत असे. तोंड बंद झालें की विचारांत गुंग. कित्येक दिवस तोंड उघडायची नाही. शांतारामनी तिच्या रोगाची हेळसांड केली नाहीं कितीतरी डाक्टरांना आणून दाखवलें. कोणाला कांही समजेना. बाहेरून समजण्यासारखा तो रोगच नव्हता. कांही विशेष नाही, घाबरण्याचें कारण नाही म्हणून सर्व डाक्टर सांगत.

आता तिला वेळोवेळीं फिट्स् येऊं लागल्या. बेशुद्ध पडली म्हणजे बराच वेळ पडे. नवरा समोर आला म्हणजे तिचें डोकें अधिकच बिघडे. यामुळे तिच्या औषधपाण्याची व्यवस्था करण्यास आणि तिला लागेल तें देण्यास त्यांनी आपल्या अत्यंत जवळच्या स्नेह्याला सांगितलें होतें. नारायणराव तिची अगदी घ्यावी तशी काळजी घेत. झटका आला म्हणजे शुश्रुषेला तेच पुढें होत.

वेडाच्या भरांत ती त्यांना एखादे वेळीं कवटाळायचीहि. पण शुद्धीवर येतांच ती खजील होई आणि झाल्या गोष्टीचा तिला पस्तावा वाटे. पण नेहमीच्या सेवाशुश्रूषेमुळे नारायणरावाविषयींचा परकेपणा कमी होत चालला होता.

पण वेडाची लहर वाढतच चालली होती. शांतारामला काय करावें हें सुचेना. डाक्टरांनी आग्रहास्तव औषधें देऊन पाहिलीं, पण परिणाम होईना. याच सुमारास विलायतेहून शिक्षण घेऊन आलेले एक नामांकित डाक्टर कांही रोगी तपासण्याकरिता आले होते, त्याचा त्यांनी फायदा घ्यायचें ठरवलें. त्यांनी मानसशास्त्राचा विशेष अभ्यास केला होता. त्यांना खरें कारण समजायला वेळ लागला नाही. शांतारामना बाजूला नेऊन डाक्टर म्हणाले, 'आपण त्यांची हेळसांड करीत असावे असें दिसतें. त्यांना पतिसुखाची विशेष आवश्यकता आहे. श्रीमंत लोक बाहेरच्या नादाला लागून घरीं स्वतःच्या बायकोच्या सुखाकडे पहात नाहीत. आपल्या हातून अशी चूक होत असल्यास ती आपण सुधरून घेतली पाहिजे. हा रोग अशा मनःस्तापापासून होत असतो. वृद्ध कपींच्या बायकांना आणि प्रौढ विधवांना हा रोग बहुशः होतो. अशा स्थितींत स्त्रियांना सवलत तरी देणें भाग आहे किंवा समाजव्यवस्थेंत बदल करणें भाग आहे. एरवीं एकतर त्यांचा पाय वांकडा पडतो नाहींतर असा रोग पछाडतो.'

आपल्याच पापाचें तें फळ आहे हें आता शांतारामला स्पष्ट कळून आलें. त्यांच्या हातून ही मोठी चूक झाली खरी, पण ते जात्या राक्षसी मनोवृत्तीचे नव्हते. लक्ष्मीला वांचवायची, आणि त्याकरता काय करावें लागेल तें करायचें असा त्यांनीं मनाशीं निश्चय केला. त्यांनी नारायणरावांना एका बाजूला नेऊन सर्व गोष्टीचा उलगडा केला. 'माझी, माझ्या घराण्याची आणि बायकोची अब्रू मी तुझ्या हातीं दिली आहे. तूं दगा देणार नाहींस हें समजून आणि लक्ष्मीचा जीव वांचावा म्हणून मला ही गोष्ट करावी लागत आहे.'

— नारायणराव लक्ष्मीची सेवा करीत होतेच आणि वेडाच्या भरांत कां होईना तिनें त्यांना अनेक वेळां कवटाळलें होतें. घराची सर्व व्यवस्था नारायणरावांवर

सोपवून शांताराम कांही दिवस डाक्टर शोधण्याचा निमित्ताने बाहेर गेले. मधे एखादा दिवस येऊन पुन्हां जात. थोडक्याच दिवसांत लक्ष्मीचें वेड कमी झालें. नारायणरावांचा घरोबा कायम राहिला. शांताराम नारायणरावांना केव्हांहि मत्सराने वागवीत नसत.

लक्ष्मीला मुलगा झाला, माहेरीं आनंदी आनंद झाला.

कांही दिवसांनी तो शांतारामना बाबा, बाबा म्हणूं लागला, पण त्याला ळळा नारायणरावांचाच जास्त लागला होता. ते नेहमी त्याला खेळवीत बसत. शांतारामनाहि आपल्या पापाचें प्रायश्चित्त घेतल्याबद्दल एक प्रकारचें समाधान वाटत होतें. शांतारामचें व्यंग तिघांबाहेर केव्हाच फुटलें नाहीं.

---

# पत्रव्यवहार

१.

वि. वि. 'समाजस्वास्थ्य' मासिकाने ८ व्या वर्षापर्यंत मजल मारली याबद्दल आपलें मनःपूर्वक अभिनंदन करतों. या अवधींत आपल्यावर व आपल्या मासिकावर संकटें आलीं असतांहि आपण आपल्या कार्यापासून परावृत्त झालां नाही, हे उदाहरण तरुणांस आदर्शभूत आहे. समाजस्वास्थ्याचा मी प्रथमपासून वर्गणीदार आहें व आतापर्यंत समाजस्वास्थ्याने मला पुष्कळ ऋणी करून ठेवलें आहे. मी आपला एक सामान्य वाचक असल्याने माझ्या अनुभवास फारसें महत्त्व नाही. परंतु अंगीकृत कार्यांत आपणांस कितपत यश आलें, हें समजण्यास माझ्यासारख्या वाचकांचा अनुभव हेंहि एक साधन असल्याने आपणांस तो थोडक्यांत कळविणें हें मी एक कर्तव्य समजतों.

एका वाक्यांत सांगायचें झाल्यास मला असें म्हणावें लागेल की प्रथम 'संततिनियमन' हें पुस्तक व नंतर 'समाजस्वास्थ्य' अवतीर्ण झालीं नसतीं, तर

माझी जीवनयात्रा फारच दुःखकारक झाली असती. मी इंग्रजी वाङ्मय वाचूं शकतों इतकेंच नव्हे तर तें वाचण्याचा मला थोडाफार नादहि आहे. परंतु त्या भाषेंतून मीं कामशास्त्र अगर आरोग्य या विषयांवरील ग्रंथांचा, जरूर असूनहि, परिचय करून घेतलाच असता असें मला वाटत नाही. इतर लोकांप्रमाणें मी या विषयास पूर्वी बहिष्कृतच समजत होतों. माझी शारीरिक व मानसिक प्रकृति 'नॉर्मल्' आहे अशी माझी समजूत आहे. असें असूनहि मी कित्येक गोष्टींस फाजील महत्त्व देत होतों, व कांही गोष्टींचा बाऊ करून मनास घाबरवून टाकीत होतों. स्त्रियांसंबंधी माझी वृत्ति मोकळेपणाची नव्हती. परंतु आपल्या लिखाणामुळे हीं मानसिक भुतें नाहीशीं झालीं असून आत्मविश्वास व निर्भयता हे गुण वाढले आहेत अशी माझी खात्री आहे.

आपण कदाचित् इंग्रजींत मासिक चालविलें असतें, तरी मला त्यापासून फायदा झाला असता, परंतु माझ्या पत्नीस जुजबीच इंग्रजी येत असल्याने, तिची मानसिक सुधारणा होण्यास मार्ग नव्हता. तिची बुद्धि तीव्र आहे व 'थोडाबहुत विचार करण्याची अक्कल' ही आहे. परंतु एवढ्या भांडवलावर भागलें असतें असें वाटत नाही. तिच्यांत व माझ्यांत मानसिक विषमता वाढतच गेली असती आणि आम्ही जगांतील मोठ्या सुखास आंचवलों असतों. स्त्रीसुलभ असणारे दुर्गुण, म्हणजे संशयग्रस्तता, मत्सर इ. तिच्यांत होते, व त्यांपासून मीं भरपूर त्रासहि सोसला आहे. आपणास कामवासना आहे असें नुसतें दर्शविणें सुद्धां तिला असभ्यपणाचा कळस वाटत असे. परंतु नियमितपणें दरमहा मिळणाऱ्या समाजस्वास्थ्याच्या डोझने तिची प्रकृति चांगलीच सुधारली आहे. हल्लीं आम्हीं खऱ्या वैवाहिक सुखाचा अनुभव घेत आहोंत, व यास मुख्यतः कारण समाजस्वास्थ्य असल्याने त्याबद्दल कृतज्ञता वाटणें स्वाभाविक आहे.

मासिकासंबंधी एकदोन सूचना कराव्या असें वाटतें, त्या अशाः—१. आपण मासिकावर नग्न चित्र घालतां हें योग्यच आहे. परंतु ही चित्रें सुंदर दिसत नाहीत. माझ्या मतें उत्तम व संपूर्ण नग्न पुतळ्यांचे फोटो मिळत असल्यास ते

घालावे. मला पक्कें माहीत नाही, परंतु याला कायद्याची अडचण येणार नाही असें वाटतें. प्रत्यक्ष नग्न आकृतीपेक्षा पुतळ्यांचे फोटो घालणें गैर खरें, परंतु हल्लीपेक्षा ती सुधारणा होईल. २. स्त्रीपुरुषांचे जननेंद्रियांच्या आकृति जाड कागदावर छापून विक्रीकरितां प्रसिद्ध कराव्या. आपल्या आधुनिक कामशास्त्रांत अशा आकृति आहेत. परंतु स्वतंत्र रीतीने त्या छापवल्यास तें पुस्तक जवळ न बाळगणाऱ्या वाचकांचीहि सोय होईल. ३. संततिनियमनाचें एखादें क्लिनिक पुण्यास चालवणें शक्य नाही काय ?

उ. आपल्या उत्तेजनपर पत्राबद्दल आम्ही अत्यंत आभारी आहों. १. चित्रासंबंधी अधिक चांगली योजना करण्याचा प्रयत्न करीत आहों, यश आल्यास दिसेलच. २. आधुनिक कामशास्त्राची दुसरी आवृत्ति काढतेवेळीं कांही चित्रें वेगळीं छापण्यासंबंधी सुचनेचा विचार करूं. ३. पुण्यांतील चारपांच नर्सांना आम्ही 'डच् कॅप्' बसवण्यासंबंधी माहिती कांही वर्षांपूर्वी दिली होती व त्यांस हेंहि सांगितलें होतें की आम्ही जशी बसवण्याबद्दल फी घेतों, तशी घेतल्यास त्यांत त्यांचा फायदाच होईल. मात्र प्रारंभीं अनुभव येईपर्यंत आकाराचा अजमास चुकल्यास कांही कॅप् फुकट जातील, परंतु याचा वचपा पुढे सहज निघेल. त्यां-पैकी एकीच्याहि हातून हें साहस झालें नाही. अजूनहि कोणी नर्स हें काम करण्यास तयार असल्यास आम्ही माहिती देण्यास तयार आहों. **सं.**

## २ ( संक्षिप्त )

वि. वि....मुखपृष्ठावरील चित्रासंबंधाने मला ज्या कल्पना सुचत आहेत त्या आपल्या सेवेसी निवेदन करीत आहे...या सूचना करायच्या म्हणजे पुनः अश्लीलतेचें पिशाच तोंड वासून पुढे उभें राहतें. अश्लीलता म्हणजे काय? आप-णावर झालेल्या खटल्यांत प्रागतिकांसंबंधी द्वेषभावनाच दिसून येते. वास्तविक पाहतां आरोग्याचे नांवावर लैंगिक विषयाचें वाङ्मय (समाजस्वास्थ्यापेक्षाहि वरचढ) हिंदुस्थानांत परदेशाहून कितीतरी येतें. याची जाणीव आपणाविरुद्ध उठणाऱ्या नीतिवाजांस नाही असें नाही, पण जेथे कर्त्यांना खड्ड्यांत घालण्याचीच भावना

प्रबल आहे तेथे निष्पक्ष समतोल बुद्धि येणार कोठून?...कोठे 'आलेती'च्या चित्रावर आक्षेप घेतले जातात, तर कोठे 'प्रायव्हेट्' फोटो 'प्रायव्हेट' रीतीने बाजारांत दिवसाढवळ्या विकले जातात व हे कोणत्याहि शास्त्रीय हेतूने विकले जात नाहीत हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. आता मुखपृष्ठांवरील चित्रासंबंधी माझे मत सांगतो. १९३२ मधील चित्र चौदा वर्षाच्या एका अज्ञातयौवनेचें होतें, तिच्या उत्फुल्लोन्मुख यौवनाचें तिला भानहि नाही, तसेंच तिच्या मोहक सौंदर्याकडे पाहून कोणी मोहित होत असेल याचेंहि तिला ज्ञान नाहीं. हें चित्र फारच चित्ताकर्षक होतें. दुसरें चित्र १९३३ चें. हें चित्र ह्मणजे एक सोळा सतरा वर्षांची यौवनधनमानिनी असून लावण्याचा गर्व तिच्या मुद्रेवर स्पष्ट दिसत आहे. या ठिकाणीं जयदेव कवीच्या काव्याची आठवण होते. कलहान्तरिता नायिका ह्मणते, हरिहरि याहि माधव याहि केशव मा वद कैतववादम्। तामनुसर सरसीरुहलोचन या तव हरति विषादम्... तिसरें चित्र मात्र तसें आकर्षक नाही... हल्लींच्या चित्रांत दोन संप्राप्तनवयौवना किशोरी वाचकांकडे निर्भावमुद्रेने पहात आहेत व आपणाकडे कोणी पहात आहे याची त्यांना पर्वा नाही... शारदाबाईनीहि आपला अभिप्राय जाहीर करावा. त्यांच्या निर्भीक अभिप्रायांचें फारच कौतुक वाटतें. त्यांच्या लेखनीचा प्रहार ज्याच्यावर पडतो, तो पुनः तोंड वर उचलतांना दिसून येत नाही... आपला 'अभिसारक'

३.

३६५ जघन. १......२. संततिनियमनावर आज मराठींत जीं पुस्तकें आहेत त्यांत कोणतें वरच्या दर्जाचें आहे असें आपणांस व्यक्तिशः वाटतें? ३. पांच किंवा जास्त वर्षे सक्त मजुरीची शिक्षा झालेल्या हिंदु कैद्यांच्या बायकांना पुनर्विवाह करतां येईल काय? ४. कैदी नवऱ्याने पत्नीच्या पोटगीची कांहींच सोय केली नसल्यास तिने पुनर्विवाह केल्यास गुन्हा होईल काय? ५. गुन्हा होत असल्यास पोटगीची सोय, शारीरिक व मानसिक अस्वास्थ्य, समागमाच्या अभावीं होणारे हिस्टेरिआ वगैरे रोग इ. कारणें दाखवून कायदेबाजींतून बचाव होईल काय? ६. अकालीं केंस पांढरे होण्याचें कारण काय? उपचार आहे

काय ? दांत घासतांना हिरड्यांतून रक्त येणें हा विकार कशामुळे होतो ? उपचार कोणता ?

उ. १. घर्षणापासून वीज उत्पन्न होते असें कांही डाक्टर म्हणतात; कांहींचे मतें शोभा येते आणि शोभा हा उपयोगच आहे. २. अर्थात् आमचें स्वतःचें पुस्तक. ३. फक्त नवरा मेला असल्यासच पुनर्विवाह करतां येतो. ४. तिला पुनर्विवाह करतांच येत नाही. ती तशीच कोणाजवळ राहिल्यास तो व्यभिचार होईल, पण व्यभिचाराबद्दल बायकांना कायद्यांत शिक्षा नाही. ५. तिला कायद्याची भीतीच नाही, फक्त समाजाची भीति असते, पण काम करून पोट भरण्यास किंवा न भरलें तर मरण्यास समाजाची परवानगी असते. ६. केंस पांढरे होण्यावर उपाय अजून सांपडलेला नाही. कांही रोगामुळे झाले असल्यास रोग बरा झाल्यावर पूर्ववत् होतात. कारणें फारच थोड्या रोगांचीं सागतां येतात. ७ दांत स्वच्छ ठेवणारांना देखील दांतांचे विकार होतात. यासंबंधी मागे एक लेख आलेला आहे. तात्पुरता उपाय म्हणजे कापसाचे बोळ्याने 'टर्पेंटाइन्' लावावें.

४.

१......२. वरील कारणामुळे माझे बायकोची तृप्ति होत नाही. त्यामुळे माझे शेजारीं एक तरुण रहात होता त्याजवर ती प्रेम करूं लागली. मी दिवसा बाहेर गेलो असतां ता तरुण व माझी बायको दार बंद करून एकांतांत असतां मी अवचित् कांही कामाकरता घरीं आलों व दार आंतून बंद असलेमुळे मला संशय आला. म्हणून दाराशींच फटींजवळ कान देवून उभा राहिलों. तेव्हा आंतून त्यांचा संवाद ऐकूं आला. माझी बायको त्या तरुणास म्हणाली, '...... असता तर मी कधीहि तुमचेकडे आलें नसतें.' हे शब्द मीं बाहेरून ऐकले व माझ्यांतच दोष असलेमुळे माझे बायकोस असें करावें लागलें, म्हणून मी तिला दोष बिलकुल न देतां तसाच मुकाट्याने परत कामावर गेलों. ही ओळख मी अद्याप बायकोस दिली नाहीं व ती मजसीं प्रेमाने वागते. तर यांत माझा दोष



३

किंवा बायकोचा दोष आहे ? व मीं तीस असें वागूं द्यावें काय ?......

१. डाक्टराकडून कापून घ्यावें. २. यांत अर्थातच तुमचा दोष नाही आणि एकंदरींत तुम्ही समंजस मनुष्याप्रमाणेच वागलां. धर्मांत व्यभिचाराला दोष समजतात, पण कायद्यांत बायकांचे व्यभिचाराला दोष समजत नाहीत, निदान त्याला शिक्षा नाही. बायकोला असें वागूं द्यावें की नाही, याचा निर्णय आम्हास करणें शक्य नाही, परंतु न देण्याच्या दृष्टीने बायकांवर पहारा ठेवण्याचे प्रयत्न यशस्वी होण्याचा फारसा संभव नसतो, आणि असे नवरे स्वतःला मात्र त्रास करून घेतात, बाकी व्हायचें असेल तें होतेंच. **सं.**

---

# शारदेचें पत्र

प्रतिभेच्या एका अंकांत नागपूरच्या प्रो. पेंडशांनीं ' कृष्णाबाई ' आणि ' विभावरी शिरूरकर ' यांच्या लिखाणावर वस्तुस्थितीचा विपर्यास केल्याचा आरोप केला आहे. त्यांचें म्हणणें असें की स्त्रीच्या हृदयावर प्रेमाचा पगडा असतो असें सांगण्याची जरूरी कां भासली, तर वस्तुस्थिति तशी नाही म्हणून. खंडण करण्याची ही पद्धत फारच उपयोगी आहे. ब्रिटिश लोक स्वतःच्या फायद्याकरता हिंदुस्थानावर राज्य करतात व प्रजेच्या न्याय्य मागण्यांकडे देखील लक्ष देत नाहींत वगैरे अनेक प्रकारची ओरड लोक कां करतात, तर वस्तुस्थिति तशी नाही म्हणून ! अशी ही पद्धत अनेक ठिकाणीं लावतां येईल. आपलें म्हणणें सिद्ध करण्याचा देखील त्यांनी प्रयत्न केला आहे. पण तो एकांगी आहे. ते म्हणतात, स्त्रीच्या आयुष्यांत पुरुषप्रेमापेक्षा अपत्यप्रेमाचेंच अधिक महत्व असतें आणि या दृष्टीने मुलांचें योग्य रीतीने संगोपन करतां येईल असा संपन्न नवरा त्यांना पाहिजे असतो, प्रेमी नको असतो. पुरुष मात्र प्रेमाच्या कल्पनेने फसतात. प्रेम हें विष आहे, अमृत नव्हे, तेव्हां पुरुषांनी सावध असावें. शेवटचें विधान मी कबूलही करीन, पण बाकीचीं विधानें सर्वस्वी खरीं नाहीं

आणि प्रेमाच्या बाबतींत त्यांनी स्त्रियांची विनाकारण नालस्ती केली आहे. ते म्हणतात मनुष्य आय्. सी. एस्. झाला की त्याला माळ घालायला कोणतीहि मुलगी तयार होते. त्यांत बरेंच तथ्य आहे, पण पैसा नको असतो कोणाला? पुरुषांना नको असतो का? मग तेच आय्. सी. एस्. २००००, २५०००, ४००००, असा हुंडा पुकारून स्वतःचा लिलांव करतात तो कां? पैसा नको म्हणून? कांही पुरुष मुलीचें रूप पाहून पसंत करतात, पण याचा अर्थ प्रेम नव्हे. पुरुष जर प्रेमाचे भुकेले असतात तरमग असें कां? लग्न एकीकडे आणि प्रेम दुसरीकडे असें पुरुषांना सहज करतां येतें म्हणून? बरें बायकांना अपत्य-प्रेमाचें महत्त्व जास्त वाटतें म्हणावें, तर यूरोप अमेरिकेंत अशा पुष्कळ बायका असतात कीं शरीराचा आकार बेढब होईल या भीतीने त्यांना मुलें नकोशीं वाटतात. त्यांचें अपत्यप्रेम कोठे जातें? आता पेंडसे कदाचित् म्हणतील की त्या बिघडलेल्या बायका. पण याचा अर्थ असा होईल की अपत्यप्रेमाला जास्त महत्त्व असावें हें पेंडशांना इष्ट वाटतें, तें असतें असें नव्हे. स्त्रियांना प्रेमाचें महत्त्व नसतें असें म्हणावें तर प्रत्येक देशांत दरसाल लक्षावधि गर्भपात होतात ते कां? कांही स्त्रिया तरी निदान प्रेमाला बळी पडतात म्हणूनच की नाही? पेंडसे म्हणतात पुरुष प्रेमाकरता जीव द्यायला देखील तयार होतो. असा होणारा एखादाच, आणि तितक्या प्रमाणांत तशा स्त्रियाहि सांपडतील. जर्मन कवि गेठे याने विवाहित स्त्रीवर प्रेम बसल्यामुळे निराश होऊन जीव दिलेल्या एका तरुणाची गोष्ट लिहिली आहे, पण त्याची स्वतःची तसीच स्थिति झाली असतां त्याने मात्र जीव दिला नाही. मग स्त्रियांनीच प्रेमासंबंधी गोष्टी कां लिहूं नयेत? प्रेमाचें ढोंग करण्यांत पुरुष अधिक कुशल असतात म्हणून? पण हें मला कबूल नाही. पुरुषांना जशा प्रेमाच्या गप्पा मारतां येतात तशाच स्त्रियांनाहि येतात असें दाखवण्याकरताच कदाचित् या दोघींनी गोष्टी लिहिल्या असतील! नाही कोणीं म्हणावें?

जातिवंत विनोद कोठे सांपडेल अशी तुझी कल्पना आहे? तूं म्हणशील जातिवंत म्हणजे काय? मी सांगतें. कोल्हटकर आणि गडकरी हे विनोदी लेखक

होऊन गेले, पण त्यांना जांतिवंत विनोद माहीत नव्हता. म्हणजे असें की डोक्याला बराच त्रास देऊन त्यांतून वेड्यावांकड्या कल्पना त्यांना काढाव्या लागत. पण डोक्याला बिलकूल शीण दिल्याशिवाय कांही लेखकांना विनोद साधतो. ते बोलायचा किंवा लिहायचा अवकाश, त्यांत विनोद आलाच. वास्तविक त्यांचा तसा उद्देशहि नसतो, पण आपली ईश्वरी देणगीच ती. गवयाचा मुलगा जसा सुरावर रडतो, तसे ते आपले विनोदीच लिहायचे. विनोदाशिवाय त्यांना लिहितांच येत नाही. कांहीही लिहिलें की त्यांना नकळत विनोद आंत घुसलाच. अशा लेखकांचा मोठा संग्रह अश्लीलतापंडित सातवळेकरांजवळ आहे आणि ते त्यांच्या ' पुरुषार्थ ' मासिकांत लिहीत असतात. त्याचा एक अंक परवां पाहिला, त्यांत कोणता लेखक अधिक विनोदी आहे हें ठरवणें जरा कठिणच आहे. कदाचित् ही मानाची जागा श्रीमंत बाळासाहेबांनाच द्यावी लागेल. ते ह्मणतात ' परमेश्वराने पुरुषाला शौर्य, धैर्य, शक्ती इत्यादि मर्दानी गुणांनी मंडित केलें आहे. त्याचप्रमाणें स्त्रीलाहि तिचें विशिष्ट आणि अनुरुप असें सौंदर्य, नाजूकपणा, प्रेम, पावित्र्य इत्यादि गुण दिले आहेत. ' ह्मणजे प्रेमाचा, पावित्र्याचा, सौंदर्याचा, पुरुषांशीं बिलकूल संबंध नाही ! यांत पुरुषांना पाहिजे तसें वागण्याची परवानगी त्यांनी कशी खुबीने मिळवली आहे पाहिलीस की नाही ? बरें हे गुण परमेश्वरानेच पुरुषांना आणि बायकांना वांटून दिले आहेत, तरमग ' किर्लोस्कर ' मासिकाची काय मजाल आहे ते हिरावून घेण्याची ? मग नवमतवादी लेखांनी लोक बिघडतील अशी भीति परमेश्वराच्या भक्तांना कां वाटते ? परमेश्वराने दिलेल्या गुणांमुळे प्रत्येक पुरुष शूर, धीर आणि शक्तिमान असलाच पाहिजे, आणि प्रत्येक स्त्री सुंदर, नाजूक, प्रेमळ आणि पवित्र असलीच पाहिजे ! श्रीमंतांना नेत्रव्यायामाने खरोखरच सर्व स्त्रिया सुंदर दिसूं लागल्या की काय ? आणि ते चित्रकार आहेत म्हणे !

इकडे सातवळेकरांचा लेख पहावा तर त्यांना या परमेश्वरदत्त गुणांची मुळींच जाणीव नाही. ते म्हणतात, ' ब्रह्मचर्य नको, विवाहापूर्वी स्वैराचार करावा, वगैरे मतें प्रतिपादन करणाऱ्या मासिकांनी लोकांच्या सहजसिद्ध हीन

वृत्तींना उत्तेजन देण्याचें कार्य चालवलें असल्याने त्यांचा अधिक प्रसार होणारच.' या 'सहजसिद्ध हीनवृत्ति' परमेश्वरानेच उत्पन्न केल्या ना? मग त्या सातवळे-करांच्या प्रयत्नाने कमी कशा होतील? या सातवळेकरी लिखाणांत अर्थात् तर्क-शास्त्राचा कांही संबंध नसतोच, आणि ते अश्लीलतापंडित असल्यामुळे त्यांना अश्लील लिहिण्याची मुभाच आहे. प्रो. फडक्यांच्या एका साध्या गोष्टींतून त्यांनी असा सारांश काढला आहे की 'तरुण व तरुणींनी लग्नापूर्वी यथेच्छ संबंध करावे.' असा सारांश त्या गोष्टींतून मुळीच निघत नाही, हा केवळ सातवळे-करांच्या मेंदूतूनच निघाला आहे. ते म्हणतात, 'एक तासभर एका तरुणीच्या सहवासांत एक तरुण राहिला व त्यामुळे त्याच दिवशीं त्याला तिचें स्वप्न पडलें, आणि याचा अर्थ हे विद्वान असा सांगतात की 'तरुणतरुणींच्या बेजबाबदार सहवासाचा परिणाम अशा शक्तिपातांत होतो.' यावरुन सातवळेकरांचें मन किती अश्लील आहे याची तुला कल्पना येईल. शिवाय त्यांना जर कोणीं सांगितलें कीं भुकेल्या मनुष्याला स्वप्नांत लाडू दिसला तर हे लगेच त्याचा अर्थ असा करणार कीं त्या लाडवाने अजीर्ण होऊन तो मेला! यांचें सनातनी मत असें दिसतें की 'लग्नापूर्वी यथेच्छ संबंध' न करतां लग्नानंतर इच्छेविरुद्ध संबंध करावे. आणि असा कायदाच आहे, की विवाहित स्त्रीला नवऱ्याच्या मर्जीप्रमाणे स्वतःच्या इच्छेविरुद्ध संबंध करणें भाग पडतें. पुराणें वाचून जुनीपुराणी झालेली यांची अक्कल आम्हाला नको आहे.

सातवळेकर आता म्हातारे झाले आहेत असें त्यांच्याच लेखांवरून दिसतें, परंतु तरुणपणीं त्यांची स्थिति अत्यंत शोचनीय असली पाहिजे. ते म्हणतात, 'जी या तरुणाची तळमळ यांनीं वर्णन केली आहे ती जशी प्रत्यक्ष सहवासानें होते, तशीच ती असल्या कथा वाचल्यानेंहि होते...आजपर्यंत हे लोक म्हणत असत कीं लघुकथा वाचून काय होतें? पण आता जो शक्तिपात होतो तो असाअसा होतो, असें यांनीं स्पष्टच लिहिलें आहे.' स्वतःच्या डोक्यांतले विचार दुसऱ्यावर लादून मग त्याला अश्लील म्हणायचें! तें असो, पण ज्यांची तारुण्यांत गोष्टी वाचून अशी स्थिति होत असे असें दिसतें, त्या सातवळेकरांनी

म्हातारपणीं तरुणांना ब्रह्मचर्याचा उपदेश करावा ! यावरून इतकेंच सिद्ध होतें की सांतवळेकरांनां तरुणपणीं ह्या जो रोग होता, तो सर्वच तरुणांना असतो अशी त्यांची कल्पना दिसते. रोगी लोकांनी स्वतःच्या प्रकृतीवरून लोकांना केलेला उपदेश ग्राह्य समजण्याचें काय कारण आहे ? म्हाताऱ्यांनी तरुणांस ब्रह्मचर्याचा उपदेश करणें म्हणजे शेंपूट तुटलेल्या कोल्ह्याने शेंपूट कापण्याचा उपदेश करण्या-सारखें आहे. याच्या मुळाशीं हेवा असतो, दुसरें कांही नाही.

याच अंकांत अंमळनेरच्या एका बुवाबाज डाक्टरांचा लेख आहे. बुवाबाजी करण्यास सुलभ पडावें म्हणून रामचंद्र लक्ष्मण देसाई नांवाचे एक गृहस्थ 'श्री मायानंद चैतन्य' असें नांव घेऊन आपल्याला दिव्य दृष्टि प्राप्त झाल्याचें ढोंग करीत असत. दिव्य दृष्टि ही अर्थातच आत्मा, ईश्वर, लिंगदेह वगैरेसारखीच एक काल्पनिक चीज आहे, तेव्हा ती प्राप्त झाली असें ढोंग पाहिजे त्याला करतां येतें. या विद्येचा इतिहास ( दृष्टीला विद्या कां म्हणायचें हें मला तर समजत नाही ) हे गृहस्थ असा सांगतात की ही प्रथम नारायण ऋषि अथवा सूर्यनारायण यांना प्राप्त झाली. पुढें कांही दिवस लोपून शार्कराक्ष्य मुनिमंडळींना मिळाली, पुढे तीच श्रीकृष्णाला मिळाली. पुन्हा तिचा लोप होऊन पुन्हा ती या कलियुगांत श्रीविशुद्धानंदांकडून श्री मायानंद यांनी प्राप्त करून घेऊन पूर्णतेला नेली. या विद्येने त्यांनी काय दिवे लावले ते अजून दिसूं लागले नाहीत, पण 'दुनिया झुकती है ' एवढें मात्र यावरून दिसतें. पदव्या मिळवल्याने अक्कल येत नाही, तेव्हा बुवांच्या नादी लागणारे अनेक पदवीधर असतात, त्यांतलेच हे एक डाक्टर आहेत.

सातवळेकरांची आणखी एक गंमत सांगायची राहिली. ते म्हणतात,... 'विवाहापूर्वी तरुणांनी स्वैराचार करण्याची राष्ट्रीय उन्नतीसाठीं कोठे आवश्यकता आहे ? स्त्रिया पतिव्रता राहिल्या तर काय यांच्या कारखान्यांत यंत्रें ओतली जाणार नाहीत, कीं बंदुकींतून गोळ्या निघणार नाहीत ?...' राष्ट्रीय उन्नति म्हणजे यंत्रें ओतणें अशी सातवळेकरांची कल्पना दिसते. त्यांना निदान इतकें

कबूल करावें लागेल की पातिव्रत्याने यांत्रिक प्रगतीला मदत तरी होत नाही, कारण तसें असतें तर पातिव्रत्याचा मक्ता घेतलेलें हिंदुस्थान सर्वांच्या पुढे गेलें असतें; तसेंच स्वैराचाराने राष्ट्रीय प्रगतीला अडथळाहि येत नाही इतकेंच नव्हे तर मनुष्याला जितकीं फाजील बंधनें घालावीं तितकी त्याची मानसिक गुलामगिरी वाढत जाते. अशा प्रकारचीं बंधनें कोणत्याहि पौराणिक किंवा ऐतिहासिक वीरांनी पाळलेलीं नाहीत, आणि मराठ्यांच्या इतिहासांतील शूर स्त्रियांनीहि पाळलेलीं नाहीत. सामाजिक दास्यांत असलेल्या स्त्रियांचें शौर्य काय वर्णावें ? रजपूत स्त्रियांचें शौर्य म्हणजे युद्धाचे अगोदर सर्वांनी मिळून एकजुटीने जीव द्यायचा ! हा धर्म असेल तर त्याला आग लावा.

तुझी शारदा

---

# ऋतुस्रावासंबंधी ताजी माहिती

——+:०+:——

( प्रेस मेडिकॅलवरून )

महिन्यांतून अमूकच दिवस गर्भधारणा शक्य आहे असें गृहीत धरून तितके दिवस समागम वर्ज्य करून संततिनियमन करण्याचा मार्ग ख्रिस्ती धर्मगुरुंनी पसंत केलेला आहे आणि याला ते नैसर्गिक पद्धत म्हणतात. अर्थात् याला नैसर्गिक म्हणणें चूक आहे, कारण या वर्ज्य समजण्याच्या दिवसांतच स्त्रीची कामवासना जास्त असते, तेव्हा ही पद्धत यशस्वी असेल तरीहि न्याय्य नाही हें उघड आहे. तथापि ही पद्धत यशस्वी तरी कितपत आहे, हें आपणांस आजतागायत माहितीवरून पहायचें आहे.

यासंबंधी अगदी अलीकडेपर्यंत बराच गैरसमज असे. यासंबंधी यूरोपांतील पहिला लेख १८८३ सालीं प्रसिद्ध झाला, त्यांत 'कापेलमान' नांवाचा लेखक म्हणतो की ऋतुस्रावापूर्वीचे तीन दिवस आणि नंतरचे १४ दिवस, यांतच

गर्भधारणेचा संभव असतो. परंतु ही माहिती आता चुकीची ठरली आहे. यासंबंधी 'ओजीनो' नांवाचा एक जपानी डॉक्टर आणि 'क्नाउस्' नांवाचा एक आस्ट्रिअन् डॉक्टर, या दोघांनी एकच माहिती स्वतंत्रपणें प्रसिद्ध केली. ही नवीन माहिती प्रथम १९०३ सालीं प्रसिद्ध झाली, आणि आता ती खरी असल्याबद्दल खात्रीलायक पुरावा मिळाला आहे. ती सांगण्यापूर्वी कांही आनुषंगिक गोष्टींचा विचार करणें जरूर आहे.

स्त्रीचें बीज म्हणजे 'रजोगोल' पक्व झाल्यावर जर त्याचें रेतजंतूशी मीलन लवकरच झालें नाही तर तें मरणाच्या पंथास लागतें. कोंबडीं, ससे वगैरे प्राण्यांवर प्रयोग करून हा सामान्य सिद्धांत प्रथम काढला. सशांचे बाबतींत हा एक विशेष आहे की समागमाशिवाय बीज पक्वच होत नाही. त्यामुळे ताज्या पक्व बीजाचें रेतजंतूशी हटकून मीलन होतें. परंतु एका कल्पक डाक्टराने यासंबंधी असा एक प्रयोग केला की त्यावरून या मीलनाशिवाय बीज किती वेळ जिवंत राहूं शकेल हें समजावें. त्याने एका नराच्या बीजनलिका कापून टाकल्या, यामुळे समागम शक्य असूनहि स्रावांत जंतु असणें अशक्य झालें (हाच प्रयोग मनुष्यावर संततिनियमनाकरता करतात). नंतर त्याचा एका मादीशी समागम करवला, त्यामुळे तिचें बीज मात्र पक्व झालें, पण गर्भ राहिला नाही. नंतर तिचा एका साध्या सशाशी समागम करवला. असें अनेक वेळां करून पाहतां त्याला असें दिसलें की जर हा दुसरा समागम पहिल्यानंतर कांही तासांचे आंत झाला नाही तर गर्भधारणा होत नाही यावरून पक्व झाल्यानंतर बीज कांही तासांचे वर जगत नाही असें अनुमान निघतें. तसेंच इतर कांही प्रयोगांवरून असें मानण्यास सबळ आधार दिसतो की गर्भधारणा न झाल्यास स्त्रीचें बीज ४८ तासांचे वर जगत नाही

दुसरा प्रश्न असा की रेतजंतूंस योनिमार्गांतून बीजनलिकांच्या शेवटच्या टोंकापर्यंत पोंचण्यास किती वेळ लागतो ? एक लेखक म्हणतो की ८ पासून १२ तास लागतात. दुसरे अनेक लेखक म्हणतात की हें अंतर सुमारें ८ इंच

आहे, तेव्हा रेतजंतूंचा वेग पाहतां या अंतराला सुमारें तास दीड तास लागावा. परंतु येथे केवळ रेतजंतूंच्या गतीचाच विचार करून भागणार नाही, कारण ते स्त्रीच्या शरीरांत शोषले जातात, यामुळे त्यांची गति वाढते.

नंतर असा प्रश्न येतो की रेतपतनानंतर रेतजंतु किती दिवस जिवंत राहतात ? त्यांना ओलावा व उष्णता पुरेशी मिळाल्यास ते कांचेचे नळींत देखील पंधरा दिवस जिवंत राहिलेले आहेत. इतर प्राण्यांत मादीच्या शरीरांत देखील ते बरेच दिवस जिवंत राहतात. उदाहरणार्थ कोंबडीच्या शरीरांत महिनाभर आणि मधमाशीच्या शरीरांत चारपांच वर्षेपर्यंत राहतात. परंतु सस्तन प्राण्यांत मात्र हा काल बराच कमी असतो. मनुष्याचे बाबतींत रेतजंतूंच्या जिवाला बरींच विघ्नें असतात. वृषणापेक्षा स्त्रीचे शरीरांत उष्णता जास्त असते व योनिमार्गांत कमी अधिक प्रमाणांत लॅक्टिक् ॲसिड् असतें. योनिमार्गांतील रेतजंतु बहुतांशीं १५ मिनिटांतच मरतात आणि दोन तासांचे वर एखादाच जिवंत राहतो. गर्भाशयाचे तोंडांत मात्र आम्ल नसतें, तेथ रेतजंतु ३ दिवसपर्यंत जिवंत राहूं शकतात, परंतु गर्भाशयाचे पोकळींत ते दोन दिवसांपेक्षा जास्त जगत नाहीत. बीजनलिकांत मात्र ते जास्त दिवस जिवंत राहूं शकतात. एका डाक्टराला समागमानंतर १४ दिवसांनी बीजनलिकांत जिवंत जंतु सांपडले, आणखी एका डाक्टराला साडेसात दिवसांनी सांपडले परंतु सामान्यतः ते इतके जगत नाहीत. ओजीनोचे मतें ते सामान्यतः तीन दिवस, परंतु क्वचित आठ दिवसपर्यंतहि जिवंत राहतात. परंतु रेतजंतु जिवंत असले, तरी त्यांत गर्भोत्पादनशक्ति असतेच असें नाही. तथापि ती आहे की नाही हें निश्चित सांगणें कठिण आहे.

वरील सर्व विवेचनावरून इतकें ठरतें की बीज पक्व होण्याचा काल आणि समागमाचा काल या दोहोंत फारसें अंतर नसेल तरच गर्भधारणा शक्य आहे. तेव्हा बीज पक्व होण्याचा काल नक्की झाला की त्यावरून समागमाचा इष्ट किंवा अनिष्ट काल ठरवतां येईल. पहिला काल अनेक निरनिराळ्या रीतींनी ठरवलेला आहे. त्याची एक खूण म्हणजे स्त्रियांच्या कामवासनेची एक लाट या

सुमारास असते व दुसरी मासिक स्रावाचे सुमारास असते. बीजकोश हाताने चाचपण्याची संवय ठेवल्यास तो या वेळीं फुगीर लागतो. माजाचा विशिष्ट काल नसून पाहिजे त्या वेळीं समागमास उद्युक्त होणारा मनुष्याव्यतिरिक्त एकच प्राणी आहे, तो म्हणजे बॅबून नांवाचा जो वानर असतो तो. त्यांचे बाबतींतहि स्त्रियां प्रमाणेच स्थिति असते व त्यांचें या दृष्टीने अवलोकन एका डाक्टराने केलें आहे, त्यापासून याला पुष्टि मिळते. या सर्वांचा असा निष्कर्ष निघतो की ऋतुस्रावाचे सुरवातीपूर्वी १४ दिवस स्त्रीबीज पक्व होतें. तेव्हा यापूर्वीचे तीन दिवस व नंतरचे तीन दिवस सोडल्यास बाकीच्या दिवसांतील समागमाने गर्भधारणेचा फारसा संभव नाहीं. १९३० सालीं डॉ. ओजीनो यांनी ५५ स्त्रियांची हकीकत प्रसिद्ध केली, त्यांपैकी फक्त १५ स्त्रियांस हा नियम लागू पडला नाही. १९३२ सालीं त्यांनी आणखी एक लेख प्रसिद्ध केला, त्यांत अमुक दिवशीं समागम केला असें नक्की सांगतां येणाऱ्या स्त्रियांचाच विचार केला होता. त्यावरून असें दिसतें की या सात दिवसांत समागम केलेल्यांस प्रत्येक वेळी गर्भधारणा झाली. पांच दंपती नियमाने ऋतुकालापूर्वीच्या १० दिवसांतच समागम करीत असत. असें ११५ महिने केलें, त्यांत गर्भधारणा झाली नाही. ऋतुकालानंतरच्या सात दिवसांत समागम करणारांत मात्र क्वचित कांहीं गर्भधारणा झाल्या. बीज पक्व झाल्यावर तीन दिवसांनंतर झालेल्या विवाहांत ताबडतोब गर्भधारणा झाली नाही. क्नाउसनेहि अशाच हकीकती प्रसिद्ध केल्या आहेत. नियमाने २८ दिवसांनी रजस्वला होणाऱ्या स्त्रियांत वर सांगितलेले दिवस वर्ज्य करून एकहि गर्भधारणा झालेली त्याला आढळली नाही.

धार्मिक ज्यू लोकांचे मतें शक्य तितकीं मुलें उत्पन्न करण्यास त्यांना ईश्वराची आज्ञा असल्यामुळे या बाबतींत ते काय करतात हें विचारणीय आहे. त्यांच्यांत पुढील दिवस समागमास निषिद्ध समजलेले आहेत. १. ऋतुस्रावापूर्वी निदान २४ तास; २. ऋतुस्रावाचे दिवस ( हे निदान पांच दिवस समजतात ); ३. या ५ दिवसांनंतरचे ७ दिवस, किंवा स्राव ५ दिवसांपेक्षा जास्त टिकल्यास

तो बंद झाल्यावर ७ दिवस. इतके दिवस वर्ज्य केल्यास गर्भधारणेचा संभव वाढतो हें निर्विवाद आहे.

आता वरील विवेचनाचा व्यावहारिक उपयोग कसा करावा हें पाहूं गेल्यास पहिली गोष्ट दिसते ती ही की नियमित २८ दिवसांनी स्राव होणाऱ्या स्त्रिया थोड्या असतात. ओजीनो यांना जपानांत फक्त शेंकडा ९ च स्त्रिया अशा सांपडल्या. उलट पक्षीं शेंकडा २० स्त्रियांना ३४ दिवसांपेक्षा जास्त आणि शेंकडा १० ना २५ पेक्षा कमी दिवस जातात. कांही स्त्रियांचे बाबतींत कांही नियमच नसतो. फार थोडा फरक पडत असल्यास स्त्रिया स्वतःला नियमित समजतात, पण त्या वस्तुतः तशा नसतात अर्थात् ऋतुस्रावास कांही नियमच नसल्यास तेथे कांहीच करतां येणार नाही, पण ज्यांना नियमितपणें २८ पेक्षा कमी किंवा जास्त दिवस लागतात, त्यांचेबद्दल नियम तयार करतां येईल. त्यांत एकच गोष्ट लक्षांत ठेवणें जरूर आहे. ओजीनोच्या मताप्रमाणे बीज पक्व होण्याचा दिवस मागच्या ऋतुस्रावावर अवलंबून नसतो, त्याचा पुढच्या ऋतुस्रावाशी संबंध असतो. हा दिवस पुढच्या ऋतुस्रावापासून मागे मोजल्यास कमींतकमी १२ वा व जास्तींत जास्ती १६ वा असतो, परन्तु बहुधा तो १५ वा दिवस असतो. या वेळीं ज्यांना मासिक स्रावाप्रमाणेच थोडाबहुत त्रास होतो, त्यांना पुढच्या स्रावाची तारीख एखाद्या दिवसाच्या फरकाने सांगतां येईल. वरील माहितीवरून गर्भधारणेचा काल सहज काढतां येईल. स्रावाचा महिना २६ दिवसांचा असल्यास ९ व्या दिवसापासून १३ व्या दिवसापर्यंत, २८ चा असल्यास ११ पासून १५, ३० चा असल्यास १३ पासून १७. याचा जर व्यवहारांत उपयोग करणें असेल तर निदान १२ महिनेपर्यंत स्रावाच्या तारखा नोंदून ठेवणें जरूर आहे. पुढील स्राव केव्हा होणार हें नक्की कळल्यावर त्यावरून गर्भधारणेच्या तारखा ठरवण्याकरता त्यांतून १४ दिवस वजा करावे आणि रेतजंतूंच्या जिवाची मुदत म्हणून आणखी चार दिवस कमी करावे, म्हणजे तेथून पुढे एक आठवडा गर्भधारणेचा काल झाला.

कांही झालें तरी संततिनियमनाकरता अशा नियमांवर अवलंबून राहणें

धोक्याचें आहे, कारण वरील नियमांस पुष्कळ अपवाद आहेत. परंतु ज्यांस संतति पाहिजे असून होत नसेल, त्यांस मात्र याचा निःसंशय उपयोग होईल, कारण गर्भधारणेचा संभव सर्वांत जास्त केव्हा असतो हें यावरून निर्विवाद कळते.

---

**आमच्या खटल्याचा शेवट.** ता. १३ आगस्ट रोजा आमचा फेरतपासणी अर्ज येथील हायकोर्टांत चीफ जस्टिस व जस्टिस सेन यांजपुढे सुनावणीस निघाला. लैंगिक विषयांची चर्चा अश्लीलतेंत मोडत नाही, शिवाय ज्या प्रश्नोत्तरांवर अश्लीलतेचा आरोप आहे त्यांपैकी एकाचा विचार करतांना मात्र विद्वान मॅजिस्ट्रेटांनी बीभत्स व अश्लील यांत फरक आहे हें मान्य करून तें अश्लील नाही असें ठरवलें आणि इतर प्रश्नांचे वेळीं मात्र हा भेद लक्षांत न ठेवतां ते अश्लील ठरवले, ही विद्वान मॅजिस्ट्रेटांची चूक आहे, असें डॉ. आंबेडकरांनी आमचे वतीने कोर्टास सांगितलें. परंतु ही चूक कायद्याच्या मुद्द्यासंबंधी नाही आणि तशी चूक दाखवतां आल्याशिवाय फेरतपासणी अर्ज हायकोर्टाने विचारांत न घेण्याची पद्धत असल्यामुळे हायकोर्टाने अर्ज घेतला नाही. आमच्या कांही शत्रूंनी याचा विपर्यास करून हायकोर्टाने आमची शिक्षा कायम केली असा आभास उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला आहे, तो मात्र खोडसाळ आहे. कायद्याच्या तांत्रिक अडचणीमुळे अर्ज विचारांतच न घेणें आणि तो विचारांत घेऊन शिक्षा कायम करणें यांत फरक आहे. तो ज्यांना कळत नाही त्यांच्या बुद्धीची कींव येते. कांही एका मर्यादेपर्यंत अरेरावी करण्याचा मॅजिस्ट्रेटांचा हक्क हायकोर्ट कबूल करतें इतकाच याचा अर्थ आहे. या मर्यादेपर्यंत कायदेशीर रीतीने मॅजिस्ट्रेटांनीं चुकीचा निकाल दिला तरी हायकोर्ट त्यांत पडत नाही, इतकेंच. श्री. इंद्रवदन मेहता ( मॅजिस्ट्रेट ) कशाकशाला अश्लील ह्मणतील हें आगाऊ जाहीर झालेलें नसल्यामुळे आमचेवर आणखी किती खटले होतील हें सांगणें कठीण आहे, कारण आह्मीं कांहीही लिहिलें तरी त्याला अश्लील ह्मणण्याची त्यांना मुभाच आहे आणि जोंपर्यंत ते ठरीव मर्यादेंत शिक्षा देतील तोंपर्यंत हायकोर्ट तिकडे पहात नाही.